महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
E-mail : mavi.dhepune@gov.in
Web : www.dhepune.gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९
फोन नं.०२०/२६१११११५३

क्रमांक -तातप-१५२१/प्र.क्र.०७/मवि-१/ 2174

दिनांक २२.०२.२०२१

22 FEB 2021

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

**विषय - घडयाळी तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नेमणूकीस ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करणेबाबत .**

संदर्भ- शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१९/ मशि-५,दि.१८.०२.२०२१.

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन पत्र सोबत जोडले आहे.कृपया अवलोकन व्हावे

सदरहू पत्रान्वये, दि.०१.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवरील कार्यभारानुसार प्राध्यापंकाच्या रिक्त पदांच्या अनुषंगाने सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नेमणूका होण्यासाठी शासनाच्या दि.१४.११.२०१८ च्या आदेशातील तरतूदींच्या अधिन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास हरकत नसावी असे कळविण्यात आलेले आहे

तरी उपरोक्त संदर्भिय पत्रातील सुचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना कळविण्यात यावे व एकत्रित अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

22/02/21

( प्रमिला मराठे )
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय , उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत : १.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना
२.स्वीय सहाय्यक,मा.मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
३.कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दूरध्वनी क्र. -०२२-२२७९३१७१ ई-मेल- vinod.dalvi@nic.in

क्र. संकीर्ण - २०२१/ प्र.क्र १९/मशि-५ दिनांक : १८/२/२०२१

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय : घड्याळी तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नेमणुकीस ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करणेबाबत....

संदर्भ : आपले क्रमांक- उशिसं/२०२०/पदमान्यता/सीएचबी/नाहप्र/मवि-१/४८३७, दिनांक २३/७/२०२० चे पत्र व तदनंतरचे दि. ६/१/२०२१ चे पत्र.

वरील विषयाच्या आपल्या संदर्भाधीन पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, महाविद्यालयातील तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या तात्पुरत्या नियुक्तीबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना आहेत. तसेच याअनुषंगाने तासिका तत्वावर प्राध्यापकांच्या नियुक्तीसंदर्भात शासनाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयातील तरतूदी स्वयंस्पष्ट आहेत. सदरची नियुक्ती ही एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात केली जाते. त्यानंतर ही नियुक्ती आपोआप संपुष्टात येते. सद्य:स्थितीत कोविड-१९ च्या महामारीच्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाच्या दि. ४ मे, २०२० च्या आदेशातील निर्बंधामुळे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता अध्यापनासाठी घड्याळी तासिका तत्वारील अध्यापकांची तात्पुरत्या नेमणूक करण्याकरीच्या ना-हरकत प्रमाणपत्रासाठीच्या मागण्या बऱ्याच महाविद्यालयांकडून प्राप्त होत असल्याचे आपण निदर्शनास आणले आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता तसेच सद्य:स्थितीत शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान लक्षात घेता, दिनांक १.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवरील कार्यभारानुसार प्राध्यापकांच्या रिक्त पदांच्या अनुषंगाने सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नेमणूका होण्यासाठी शासनाच्या दि. १४/११/२०१८ च्या आदेशातील तरतूदींच्या आधिन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास हरकत नसावी.

(वि.व. दळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन


East:1962
NAAC 'A' Grade

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE : EPABX - 2609000**
**E-mail address-** affiliationt1@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -** ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)


शिवाजी विद्यापीठ/संलग्नता टी.१/ प्रशांत/ 3263 No 00883 दिनांक- 26 FEB 2021

प्रति,

प्राचार्य, अशासकीय अनुदानित संलग्नित महाविद्यालये व शिक्षण संस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

आपला विश्वासू,

डॉ.व्ही.डी.नांदवडेकर
कुलसचिव